## प्रकरण सहावे

## उ प सं हा र

# प्रकरण ६ वे

## उपसंहार

महाराष्ट्राच्या जीवनामध्ये सहकारी चळवळीने मोठया मोलाची कामगिरी बजावलेली आहे. सहकारी चळवळीच्या उज्ज्वल यशाबाबत कोल्हापूरचे नांवे सर्व दूरवर पसरलेले आहे. कोल्हापूरातील शेतकरी सहकारी संघ आणि वारणा सहकारी साखर कारखाना श्री. हनुमान दूध व्याव. सेवा सहकारी संस्था लि. यळगुड, इत्यादिंनी आदर्श सहकारी संस्था म्हणून सर्वमान्यता मिळवलेली आहे. कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने कोल्हापूरच्या कृषी औद्योगिक विकासात मोलाची भर घातली त्याचप्रमाणे कोल्हापूरच्या राजकिय जीवनातहि बँकेने मोलाची कामगिरी बजावली. विकासाच्या राजकारणास या बँकेने नवी गती नवी दिशा दिली. आणि अनेक नव्या राजकीय पुढाऱ्यांना बँकेने राजकीय क्षेत्रात पुढे आणले. आज कोल्हापूरातील बहुतेक सर्व राजकारणी पुढारी जिल्हा मध्यवर्ती बँकेशी कोणत्या ना कोणत्या अर्थाने संबंधित असलेले दिसून येतात. प्रस्तुत प्रबंधात या सर्व बाबींचा सविस्तर विचार करण्यात आलेला आहे.

### सारांश:

प्रस्तुत प्रबंध एकूण पाच प्रकरणात विभागण्यात आला आहे. आणि या प्रकरणातून कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आर्थिक विकासात्मक व राजकीय योगदानाचा विचार करण्यात आला आहे.

प्रबंधाच्या पहिल्या प्रकरणामध्ये अभ्यासाचा उद्देश विशद करण्यात आला आहे. १९६० नंतर नवा कृषी औद्योगिक समाज स्थापन करण्याचा

[illegible library stamp]

विचार श्री. यशवंतराव चव्हाणय यानी मांडला व त्याची अंमल-बजावणी करण्याचे धोरण तिस-या पंचवार्षिक योजनेपासून सुरु केले. या कृषी औद्योगिक समाजाच्या कार्यामध्ये शेती विकासाला पूरक असणा-या उद्योगांचा व संस्थाचा विकास सहकारी क्षेत्रात अपेक्षित होता. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये पूर्वापार सहकाराची चळवळ आकार घेत होती. त्या चळवळीचा जिल्ह्याच्या राजकारणाशी जवळचे संबंध होते. कोल्हापूर येथील राजकीय चळवळीचा, प्रजापरिषदेच्या चळवळी पासून १९ पर्यंत आढावा घेण्यात आला आहे. तसेच अभ्यासाचा उद्देश आणि अभ्यासपध्दती, अभ्यासाचे कार्यक्षेत्र याबाबतही त्यात चर्चा करण्यात आली आहे.

दुस-या प्रकरणामध्ये जिल्हा मध्यवर्ती बँकांचे स्वरुप स्पष्ट करुन त्यांच्या विकासाचा ऐतिहासिक आढावा घेण्यात आला. त्यामध्ये जिल्हा मध्यवर्ती बँकांचा उदय कशाप्रकारे झाला हे सांगितले आहे. भारतात पहिली बँक इ.स. १९१० मध्ये राजस्थानमधील अजमेर येथे स्थापन झाली. इ.स. १९१२ नंतर बँकांच्या वाढीला चालना मिळाली. सहकारी चळवळीच्या वाढीसाठी शेतक-याना किफायतशीर दरात पतपुरवठा करण्यासाठी झालेल्या घडामोडींची चर्चा करण्यात आला आहे. पुढे मध्यवर्ती बँकांच्या विकास कार्याचा आढावा घेतला आहे. भारताच्या स्वातंत्र्या-नंतरच्या काळात जिल्हा मध्यवर्ती बँकांची मोठी प्रगती झाली. त्याची देशपातळीवरही मोठी वाढ झाली. नंतर संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापने-नंतर या जिल्हा बँका शेती विकासास आधार देणा-या बँका ठरल्या. या बँकांची राजकीय व आर्थिक विकासातील भूमिका या प्रकरणात स्पष्ट करण्यात आली आहे.

तिस-या प्रकरणात कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा आढावा घेतला आहे. ग्रामीण विभागातील शेतक-याचा कर्जबाजारी पणा कमी करण्यासाठी आणि सावकारांच्या जुलूमाला शह देण्यासाठी त्यांची आर्थिक स्थिती सुधारावी म्हणून कोल्हापूर संस्थानात जिल्हा मध्यवर्ती बँक असावी या विचाराने श्री. एस्.एस्. फातर्फेकर व त्यांचे सहकारी यांनी १९३८ ला बँकेची स्थापना केली. इ.स. १९५८ ला सरकार नियुक्त बोर्ड निर्माण झाले. त्यानंतर इ.स. १९६१ ला लोकनियुक्त बोर्ड अस्तित्वात आले व त्यानंतर बँकेच्या प्रगतीला सुरुवात झाली. त्याप्रमाणे बँकेच्या कायद्यात बदल झाले म्हणून जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या करण्यात आलेले कायदा व त्यातील राजकीय दृष्टया महत्वाचे बदल यांचा या प्रकरणामध्ये ऊहापोह केला आहे. बँकेचे संघटन कशा प्रकारचे आहे. याचाही आढावा घेतला आहे. शेवटी बँकेची काही ठळक वैशिष्टयेहि सांगितली आहेत.

चौथ्या प्रकरणामध्ये कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने १९६० ते १९८५ या गेल्या २५ वर्षात केलेल्या कार्याचा आढावा घेतला आहे. बँकेने गेल्या २५ वर्षात जिल्ह्यातील निरनिराळ्या विकास योजनास आणि कारखान्यास आर्थिक मदत केली. आणि कृषी औद्योगिक समाजाचे स्वप्न साकार करण्याचा प्रयत्न केला. या शेतीमालावर औद्योगिक प्रक्रिया करणा-या संघटनांना अर्थ सहाय्य तर बँकेने दिलेच पण त्या बरोबर शेती विकासासाठी पीक कर्जे दिली. अल्प मुदतीची व मध्यम मुदतीची पीक कर्जे गरजू शेतक-यांना दिली. बँकेने पाणीपुरवठा योजना आणि दुग्ध व्यवसाय योजना यांनाहि मोठया प्रमाणात आर्थिक मदत

केली. जिल्हयातील अवर्षण-ग्रस्त व अतिवृष्ठी ग्रस्त शेतक-यांस बँकेने मदत दिलेली आपणास दिसते. या काळात व्यापारी आणि मार्केटिंग खरेदी-विक्री संघाना आर्थिक मदत केलेली दिसते. थोडक्यात जिल्हयातील अनेक विध विकास कार्यास प्रेरणा देऊन आर्थिक मदत देऊन मध्यवर्ती सहकारी बँकेने कोल्हापूर जिल्हयातील कृषी औद्योगिक समाजाचा पाया जास्त बळकट केला. शेतक-याला ख-या अर्थाने आपल्या पायावर उभे केले. या सर्व स्थित्यंतराची साधार चर्चा चौथ्या प्रकरणात करण्यात आली आहे.

पाचव्या प्रकरणामध्ये कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कार्याचा राजकीय दृष्टिकोणातून आढावा घेतला आहे. सहकार आणि राजकारण यांचे महाराष्ट्रात तसे जवळचे संबंध आहेत कारण सहकारी संस्थांच्या मदतीने राजकारणी पुढारी आपला पाया बळकट करतात. आणि सहकारी संस्था राजकीय पुढा-यांच्या मदतीने लोकां-पर्यंत आपल्या योजना पोहोचवतात. लोकांना जागृत करतात, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत जिल्हयातील सर्वच राजकीय पुढा-यांच्या नेतृत्वाची जडणघडण झाली. विकासाच्या राजकारणाचे धडे त्यांनी बँकेत गिरवले त्यातील काही जण राज्य सरकारात मंत्री झाले. अनेक जणाह खासदार, आमदार आणि जिल्हा परिषदेचे अध्यक्ष झाले. कॉंग्रेस पक्षांच्या राजकारणाहि या राजकीय नेत्यांनी मोलांचे कार्य केले. थोडक्यात कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने आपल्या प्रांतिक विकासाबरोबरच राष्ट्रीय राज्य तसेच जिल्हयाच्या राजकारणात नेतृत्व निर्माण करण्यास सहाय्य केले. या प्रकरणात जिल्हा मध्यवर्ती बँकेने

कृषी औद्योगिक समाजाच्या विकासाबरोबरच नेतृत्व विकासासहि चालना दिली याचे विवेचन करण्यात आले आहे.

ब) मूल्यमापन:

कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही तिस-या पंचवार्षिक योजनेत पुरस्कारिलेल्या कृषी विकासाच्या धोरणांची अंमलबजावणी करणारी संस्था होती. कोल्हापूर जिल्ह्यात या मध्यवर्ती बँकेने मोलाचे काम केले आहे. त्यामुळे हरित क्रांतीस मोठाच पाठींबा मिळाला. पण त्याच बरोबर विकासाच्या राजकारणाबरोबर बँकेत सत्तेचे राज-कारण ही खेळले गेले आणि बँक जिल्हा कॉंग्रेसमधील गटबाजीचे भक्ष्य बनली त्यामुळे बँकेच्या कार्यास मर्यादा पडल्या. गटबाजीचे राजकारण ही वाढले तसेच जातीयवाद ही वाढलेला दिसून येतो.

बँकेच्या कार्याबाबत टीकात्मक परिक्षण खालीलप्रमाणे करता येईल:

१) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने केलेल्या कार्याचा लाभ जिल्ह्यातील सर्वच तालुक्यांना झालेला नाही. कोल्हापूर (करवीर), हातकणंगले, शिरोळ, इचलकरंजी, या विभागांना जास्त फायदा झाला तर कागल, पन्हाळा व राधानगरी इ. तालुक्याना काही प्रमाणात फायदा झाला. तर शाहुवाडी, गगनबावडा, चंदगड, गडहिंग्लज वगैरे तालुके मागासलेले राहिले. याचा अर्थ असा की कृषी औद्योगिक प्रगतीचे लोण अजूनही काही भागांत म्हणावे तितके पोहोचले नाही. त्यामुळे जिल्ह्यात सुध्दा प्रादे-शिक विकासाचा असमतोल झालेला दिसून येतो. हा असमतोल कोल्हापूर

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक दूर करु शकलेली नाही.

२) चंदगड, गडहिंग्लज, शाहुवाडी, गगनबावडा या तालुक्याचे पुढारी बँकेचे अध्यक्ष झाले परंतु त्यांच्या भागांचा विकास फारसा झाला नाही. कारण सहकारी संस्थांचे आणि प्रक्रिया उद्योगांचे जाळे तेथील कार्यकर्ते उभारु शकले नाहीत. त्यामुळे त्या भागाचा तुलनात्मक दृष्टया फारसा विकास झाला नाही. त्या भागातील पुढारी पदाधिकारी झाले म्हणजे त्या भागाचा विकास होतोच असे नाही. हे पुन: एकदा सिध्द झाले.

३) बँकेच्या योजनांचा फायदा जिल्हयातील सधन व बागायतदार शेतक-यांना मिळाला व त्यांनी जिल्हयाच्या राजकारणावर आपली पकड निर्माण केली. परंतु गरीब दुर्बल घटकांना त्याचा फायदा झाला परंतु कमी प्रमाणात झाला. जिरायत शेतक-यांना पतपुरवठा झाला पण त्याचा विकास झाला नाही.

४) कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर कॉंग्रेस पक्षाचेच वर्चस्व कायम राहिले. परिणामी ते जिल्हा कॉंग्रेस कमिटीमध्ये असणारी गटबाजी त्यात दिसते. त्यामानाने बँकेवर विरोधी पक्षांचा प्रभाव नगण्य आहे. त्यांनी त्यावर नियंत्रण ठेवण्याचा कधी प्रयत्न केलेला दिसत नाही.

५) कोल्हापूर जिल्हयांच्या कॉंग्रेसच्या गटबाजीचाहि मध्यवर्ती बँकेवर परिणाम दिसतो. कॉंग्रेस अंतर्गत दोन तुल्यबळ संघर्ष प्रवण गटाच्यामध्ये बँकेच्या सत्तेची स्पर्धा होती.

६) कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेत कमालीची गटबाजी असतांनाहि बँकेचे स्थान महाराष्ट्रात उज्ज्वल राहिले. कारण बँकेचे प्रशासन कार्यक्षम आणि अव्वल दर्जाचे आहे. बँकेच्या कार्य-क्षमतेवर त्यामुळे राजकारणाचा फारसा वाईट परिणाम झाला नाही.

......